<u>वि.दि.दा.क्र. २८/२०२४</u>
संदीप वि. शिवाजी
<u>निशाणी क्र. ९ क्रमश</u> :

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा पुढील सरतपास वादीचे वकिल श्री. एस.जी. टिकार यांचे मार्फत शपथेवर सुरू —**

७. मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे.

८. मी निशाणी ०३ या कागदपत्रांच्या यादीसोबत अ.क्र. १ ते ३ ला एकुण तीन इसार पावत्या दाखल केल्या आहेत. त्यावर माझ्या व प्रतिवादीच्या सहया आहेत. तसेच त्यावर दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर तीन इसार पावत्यांना अनुक्रमे **निशाणी १२ ते १४** देण्यात येते. तसेच सदर यादीसोबत अ.क्र. ४ व ५ ला मी विकत घेतलेले दोन कोरे स्टॅम्प पेपर दाखल केले आहेत. त्यावर विकत घेणार म्हणुन माझे नाव व माझी सही आहे. सदर स्टॅम्प पेपरला अनुक्रमे **निशाणी १५ व १६** देण्यात येते. सदर यादीसोबत अ.क्र. ६ ला मी माझ्या वकीलांच्या मार्फत प्रतिवादीला पाठविलेल्या दिनांक १८.०६.२०२४ रोजीच्या नोटीसीची स्थळप्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १७** देण्यात येते.

९. तसेच मी आज रोजी निशाणी ११ या कागदपत्राच्या यादीसोबत दिनांक १५.०७.२०२४ रोजीच्या २२७५/२०२४ या खरेदीखताची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यावर साक्षीदार म्हणुन माझी सही आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येते.
**सरतपास संपला.**

**प्रकरण प्रतिवादीविरूध्द एकतर्फा चालविण्यात येत असल्यामुळे उलटतपास काही नाही.**

माझे समक्ष/श्रवणोत्तर स्विकृत,

स्वा/—
( महेश एस. काळे )
**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट**

दि. २८.०३.२०२५.